# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२०/०६/२०१९

## दि.१९/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३२३/१९,भादविक ४२०,३४ तसेच द स्टेटएम्लब ऑफ इंडिया ॲक्ट सन २००५ चे कलम ३,४,६ |
| **फिर्यादी** | विजय जाधव, पोलीस उप-निरीक्षक, विश्रामबाग पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.चिन्मय सुहास देशपांडे,वय-२६,रा.कसबा पेठ,पारसनीवाडा,पुणे २.सुहास मोरेश्वर देशपांडे, वय-५९,रा.सदर ३.एक महिला,वय-५४,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०६/२०१९ रोजी २०/२० वा.शॉप नं.१,पर्वती माता मंदिर सोसा. ३५९,शनिवार पेठ व देशपांडे व्हेंडरचे ५९२,बुधवार पेठ,लाल महाला समोर पुणे येथील कमला कोर्ट बिल्डींग मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसम व महिला यांनी आपसात संगनमत करुन,वरिष्ठ कोषागार अधिकारी प्रथम मुंद्रांक लिपीक कोषागार,पुणेकरिता असा बनावट शिक्का कोणताही अधिकार नसताना बनवुन घेऊन,सदरचा बनावट शिक्का १००/- व ५००/- रुपयेच्या स्टॅम्प पेपरवर मारून,त्यावर सही करुन,स्टॅम्प पेपरचा गैरवापर केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), दादासाहेब चुडाप्पा ८३७८९६०००५ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४३/१९,भादविक ४१९,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५४ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँकेचे खातेधारक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०३/२०१९ ते दि.०५/०५/२०१९ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मित्राने फिर्यादी यांना फोनवरून कळविले की, E-Dolomiti नावाची एक मल्टी लेव्हल (एम.एल.एम.) स्किम असून त्यामध्ये गुंतवणुक केल्यानंतर दर आठवडयाला ५ टक्के रक्कम परतावा मिळतो असे सांगून व्हॉटसॲपवर माहितीपत्र पाठविले. त्या कंपनीची वेबसाईट www.e-dolomiti.com अशी असुन बँकेचा अकाऊंट नंबरवर जय एन्टरप्रायझेस या नावाने पैसे पाठवावे असे नमुद होते. फिर्यादी यांनी त्यांचे बँक खात्यातून १,०५,०००/- रुपये पाठविले. तसेच फिर्यादी यांचे एकुण सात सहकारी यांनी देखील फिर्यादी यांचेप्रमाणे एकुण २,४९,९९०/- रुपये कंपनी मध्ये गुंतविलेनंतर, कालांतराने कंपनीची वेबसाईट बदं झाल्याने सदर अज्ञात मोबाईल व बँकेचे खातेधारक इसमांनी फिर्यादी व त्यांचे सहकारी यांची एकुण ३,५४,९९०/- रुपयांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. बलभीम ननावरे ८२०८०८९४४७ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे २०२/१९,भादविक ३८४,३८५,३८६,३८७,५०६(२),३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४४ वर्षे,रा.ताडीवाला रोड,पुणे |
| **आरोपी** | १.बाबु वसंत ननावरे,वय-३० वर्षे,रा.स.नं.१३,ताडीवाला रोड,पुणे २.गौतम आप्पा जगदाळे, वय-२४,रा.ताडीवाला रोड,दुष्काळ वसाहत,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०३/२०१९ ते दि.०९/०६/२०१९ रोजीचे दरम्यान नामांकीत हॉस्पीटल येथील नवीन सुपर स्पेशालिटी कॅन्सर सेंटरचे कन्स्ट्रक्शन ठिकाणी बंडगार्डन रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे खाजगी प्रा.लिमी.मुंबई येथील कंपनी मध्ये प्लंम्बिग व फायर फायटींग सिस्टीम सुपरवायझर म्हणुन काम करतात. त्यांचे कंपनीचे पुणे येथील हॉस्पीटल मध्ये नवीन सुपर स्पेशालिटी कॅन्सर सेंटरचे कन्स्ट्रक्शन ठिकाणी फिर्यादी व कामगार हे काम करीत असताना,यातील नमुद इसमांनी नमुद कालावधी मध्ये सदर ठिकाणी येवुन ते माथाडी काम करीत नसताना,त्यांचे काम बंद पाडून,त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे |

| | |
|---|---|
| | मालक यांचेकडून चेक व रोख स्वरुपात खंडणी म्हणुन ८०,०००/- रुपये जबरदस्तीने घेवुन परत आणखीन २५,०००/- रुपयेची मागणी केली आहे. तसेच पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजेंन्द्र मोहिते, खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक,गुन्हे शाखा पुणे शहर ९८२३५८८८८१ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३०५/१९,भादविक ४८९(अ) |
| **फिर्यादी** | भानुमती आयर,वय-५८,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सुमारे सहा महिन्यापुर्वी स्टेट बँक ऑफ इंडीया, मार्केटयार्ड शाखा,गुलटेकडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया चिफ बँक मॅनेजर असुन,नमुद कालावधीत मध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्टेट बँक ऑफ इंडीया,मार्केटयार्ड शाखा,गुलटेकडी,पुणे या बँकेत ५०० रूपये दराच्या एकुण ११ नोटांचा भरणा केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. एस.बी.जगताप ७२४९३३४७४६ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ५४८/१९,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | विठ्ठल जाधव, पोलीस हवालदार, कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ०८/५० वा. मेफेर एलिगंजा सोसायटी जवळील मोकळया मैदानात कोंढवा-खुर्द,पुणे येथे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मेफेर एलिगंजा सोसायटी जवळील मोकळया मैदानात एक दिवसाच्या पुरुष जातीच्या नुकतेच जन्मलेल्या नवजात अर्भकास तात्पुरते नाव अजय,वय-०१ दिवस यास त्याची पालन पोषणाची व देखभालीची जबाबदारी असतानादेखील त्याचा स्विकार न करता,त्याचा संपुर्णतः परित्याग करण्याचे उद्देशाने,त्यास उघडयावर टाकुन दिले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निंबाळकर ९८३४४९८४४२ |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३०२/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५०,रा.मंचर,आंबेगांव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०६/२०१९ रोजी ११/३० ते ०२/०० वा.चे दरम्यान मंचर ते शिवाजीनगर बस स्टॅण्ड पुणे या प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे ओळखीचे मानलेल्या आईस त्यांना घर घेण्यासाठी पैशाची गरज असल्याने त्यांना मदत म्हणुन १२ लाख रूपये रूपये रोख त्यांचेजवळील लहान शाळेच्या बॅग मध्ये ठेवुन मंचर बस स्टॅण्ड येथुन भिमाशंकर-पुणे या एस.टी. बसने पुण्याकडे येण्यासाठी बसचे मागील सीटवर बसले असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने सदर बॅगला खालुन ब्लॅडने कापुन बॅग मधील नमुद रोख रक्कम व मोबाईलसह बॅग चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. खलाणे ८३८००९६०३० |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे ३१८/१९,भादविक ३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-६९ वर्षे,रा.पर्वती,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०६/२०१९ रोजी ते दि.१५/६/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादी यांचे राहते घरातील गोदरेजच्या लोखंडी कपाटाचे लॉकरमधुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे रहाते घरातील गोदरेजच्या लोखंडी कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व ८०००/- रूपये रोख रक्कम,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे उघडया दरवाजावाटे आंत प्रवेश करून २,७४,०००/- रू किचा ऐवज चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. के.डी.संकपाळ ९४०३६३२१६० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**